योग्य मार्गदर्शन न मिळाल्याने संधिवाताचे पेशंट भटकत राहतात

संधिवात विशेषज्ञ (ऱ्ह्यूमेटॉलॉजिस्ट) डॉ. श्रीकांत वाघ यांची मुलाखत

सांधे दुखणे एक अशी समस्या आहे, की ज्याच्या त्रासाला जीवनात कधीतरी प्रत्येकाला सामोरे जावेच लागते. पूर्वी याला वाढलेल्या वयाचे लक्षण समजले जात असे, परंतु आता बैठा जॉब, बदलते लाइफ स्टाइल आणि वातावरणात झालेले बदल यामुळे कमी वयाच्या लोकांनाही हा आजार आपली शिकार बनवत आहे. रोगप्रतिकारक क्षमता कमकुवत असेल, तर सांध्यामध्ये सूज येणे हा आर्थरायटिसचा गंभीर प्रकार समजला जातो. त्याविषयी अवेयरनेस खूप कमी आहे. दुसरीकडे संधिवात विशेषज्ञ म्हणजेच ऱ्ह्यूमेटॉलॉजिस्टची संख्या कमी झाल्याने संधिवाताच्या पेशंटना अनेकदा योग्य उपचार मिळतच नाही. आयुर्वेद आणि ॲलोपॅथी दोन्हीही मेडिसीन ब्रँचमध्ये पोस्ट ग्रॅज्युएशन केल्यानंतर संधिवातामध्ये विशेषज्ञ प्राप्त करणारे डॉ. श्रीकांत वाघ पुण्यातील आर्थरायटिसच्या सुप्रसिद्ध डॉक्टर्सपैकी एक आहेत. आर्थरायटिसची उत्कृष्ट ट्रीटमेंट देण्यासाठी त्यांनी अनेक ॲडव्हान्स्ड टेक्निकचा प्रयोग पुण्यात सुरू केला. ऱ्ह्यूमेटॉलॉजिस्ट डॉ. श्रीकांत वाघ यांची 'दै. संध्यानंद'ने घेतलेली ही खास मुलाखत.

डॉ. श्रीकांत वाघ : एक दृष्टिक्षेप

- जन्मदिन – १४ मे १९५३
- प्रॅक्टिसला सुरुवात : १९८३ पासून
- २००६ पासून संधिवात विशेषज्ञ म्हणून प्रॅक्टिस सुरू केली
- स्टाफ : ७ (२ डॉक्टर + १ फिजियोथेरेपिस्ट)
- डॉ. श्रीकांत वाघ यांची आतापर्यंत ११ पुस्तके प्रकाशित झाली आहेत
- जगातील एकमेव असे डॉक्टर आहेत, ज्यांनी आयुर्वेद आणि ॲलोपॅथी दोन्ही चिकित्सा पद्धतींमध्येही मेडिसिनमध्ये पोस्ट ग्रॅज्युएशन केले आहे.
- संपर्क : फो. ०२०-२४४७८९९३, मो. ९८२२०३२३७३/९७६३४०७२२९

• तुमची कौटुंबिक पार्श्वभूमी काय आहे? शिक्षण कोठे झाले आहे?

डॉ. श्रीकांत वाघ : आमचे कुटुंब पुण्यातील रहिवासी आहे. वडील श्री. यशवंतराव वाघ सेशन न्यायाधीश म्हणून मुंबईमधून निवृत्त झाले. निवृत्तीनंतर त्यांनी बराच काळ मुंबईमध्ये लॉयर म्हणून प्रॅक्टिस केली. त्यांच्या जॉबमध्ये होणाऱ्या बदल्यांमुळे माझी शाळा अनेक शहरांत झाली. १९७० मध्ये माझे शालेय शिक्षण पूर्ण झाले. सुरुवातीपासूनच मला मेडिकल प्रोफेशनमध्ये जाण्याची इच्छा होती, परंतु मला एमबीबीएसला प्रवेश मिळाला नाही. त्यानंतर मी पुण्यात टिळक आयुर्वेद कॉलेजमध्ये बीएएमएसमध्ये प्रवेश घेतला. हा ॲलोपॅथी आणि आयुर्वेदचा इंटीग्रेटेड कोर्स होता. आता तो बंद झाला आहे. बीएएमएस झाल्यानंतर आर. ए. पोद्दार आयुर्वेद कॉलेजमध्ये मी त्याचे पोस्ट ग्रॅज्युएशन एमएएससी केले. त्यानंतर मी टोपावाला नॅशनल मेडिकल कॉलेजमध्ये एमबीबीएसचा कंडेन्स्ड कोर्स केला. त्यासाठी मी ग्रँट मेडिकल कॉलेजमधून एलसीपीएसची परीक्षा क्लियर केली. या परीक्षेच्या माध्यमातून बीएएमएसवाल्यांना एमबीबीएसचे कंडेन्स्ड कोर्समध्ये प्रवेश मिळतो. त्यानंतर मी लोकमान्य टिळक म्युनिसिपल मेडिकल कॉलेज, मुंबई येथून १९८२ मध्ये एमडी पूर्ण केले.

सूज असलेल्या ऑर्थरायटिसमध्ये सांध्यामध्ये हाडाजवळ सॉफ्ट टिश्यू लेयरमध्ये फ्लूड बनते. त्यामुळे हालचाल करणे मोठे कठीण बनते.

• तुम्ही इतक्या सर्व पदव्या घेतल्या आहेत आणि दोन्ही वैद्यकीय पद्धतींमध्ये पोस्ट ग्रॅज्युएशन मेडिसिनमध्येच का केलेत?

डॉ. श्रीकांत वाघ : इतक्या पदव्या घेणे गरजेचे होते. कारण मला ॲलोपॅथीमध्येच प्रॅक्टिस करायची होती आणि तीदेखील मेडिसीनमध्येच. (हसून) खरेतर त्यामुळे मी जगातील एकमेव अशी व्यक्ती बनलो आहे, की ज्याने आयुर्वेद आणि ॲलोपॅथी दोन्हीमध्येही मेडिसीनमध्ये पोस्ट ग्रॅज्युएशन केले आहे. मी आयुर्वेदकरिता टीचिंग करत राहिलो. सुरुवातीला मी ताराचंद आयुर्वेद कॉलेजमध्ये टीचिंग केले. पुढे मी भारती विद्यापीठाचे आयुर्वेद कॉलेजमध्ये एमडीसाठी गाइड बनलो. आयुर्वेदमध्ये मी केवळ टीचिंग आणि रायटिंगचे काम केले आहे.

• तुम्ही करिअर केव्हा आणि कसे सुरू केलेत?

डॉ. श्रीकांत वाघ : १९८३ मध्ये मी मुंबईच्या सेंट्रल गव्हर्नमेंटच्या एका डिस्पेंसरीमध्ये फिजिशियन म्हणून एक वर्ष जॉब केला. त्यानंतर १९८४ मध्ये पुण्यात आलो आणि जनरल फिजिशियन म्हणून प्रॅक्टिस सुरू केली. १९८४ ते २००५ पर्यंत मी याचप्रकारे प्रॅक्टिस केली आणि सोबतच मी आयुर्वेद कॉलेजमध्ये टीचिंगदेखील करत राहिलो. यादरम्यान १९९८ पासून २००५ पर्यंत म्युझिकचे शिक्षण घेतले. त्यामध्ये पोस्ट ग्रॅज्युएशन केले. सोबतच योगात डिप्लोमादेखील केला. त्यानंतर मी ऱ्ह्यूमेटॉलॉजीच्या क्षेत्रात आलो.

• इतकी वर्षे जनरल प्रॅक्टिसनर म्हणून प्रॅक्टिस केल्यानंतर ऱ्ह्यूमेटॉलॉजीमध्ये जाण्याचे कारण काय आहे?

डॉ. श्रीकांत वाघ : खरेतर, मी आयुर्वेदमध्ये आर्थरायटिसविषयी काही रिसर्च करत होतो. तो रिसर्च लवकर व्हावा आणि त्यासाठी आम्हाला जास्तीत जास्त पेशंट मिळावेत, त्यासाठी मी मॉडर्न ॲलोपॅथिक ऱ्ह्यूमेटॉलॉजी शिकून घेण्याचा विचार केला. मी माझे एमडी गाइड डॉ. व्ही. आर. जोशी सर यांना ही गोष्ट सांगितली. तेव्हा त्यांनी म्हटले की, हा विषय इतका सोपा नाही. त्याचे चांगल्या प्रकारे शिक्षण घेण्यासाठी तुम्हाला एक वर्षांचा सर्टिफिकेशन करावे लागेल. तेव्हा मी ५२ वर्षांच्या वयात त्याचे सर्टिफिकेशन कण्यासाठी मुंबईत केईएम हॉस्पिटलमध्ये गेलो. १ वर्षात ते पूर्ण झाले. त्यानंतर अनेक देशांमध्ये जाऊन आर्थरायटिसच्या ट्रीटमेंटचे ट्रेनिंग प्रोग्रामदेखील केले.

• त्या काळात पुण्यात किती ऱ्ह्यूमेटॉलॉजिस्ट होते?

डॉ. श्रीकांत वाघ : पुण्यात मोठ्या मुश्किलीने ३ किंवा ४ ऱ्ह्यूमेटॉलॉजिस्ट होते. देशात त्यांची संख्या खूप कमी आहे. खरेतर, संपूर्ण देशात ऱ्ह्यूमेटॉलॉजीसाठी एकूण १० जागा आहेत. मी जेव्हा त्याचे सर्टिफिकेशन केले होते, त्या काळात या सुपर स्पेशालिटी ब्रँचमध्ये देशभरात फक्त ४ जागा होत्या. ऱ्ह्यूमेटॉलॉजिस्ट बनण्यासाठी एमडीनंतर तीन वर्षांचे डीएम करावे लागते. आजही देशात जे काही ५०० ऱ्ह्यूमेटॉलॉजिस्ट आहेत त्यापैकी ९५ टक्के सर्टिफिकेशनवाले आहेत. २००६ मध्ये माझे सर्टिफिकेशन झाल्यानंतर मी लुपस क्लिनिक सुरू केले आणि जनरल प्रॅक्टिस पूर्णपणे बंद करून केवळ संधिवाताची ट्रीटमेंट करण्यास सुरुवात केली. सर्टिफिकेशन पूर्ण होण्यापूर्वीच संचेती हॉस्पिटलमध्ये माझी अपॉइंटमेंट झाली होती. त्याच्याशी मी आजही जोडलेलो आहे. त्यशिवाय पूना हॉस्पिटल, भारती हॉस्पिटल, जहांगीर हॉस्पिटल, दीनानाथ मंगेशकर आदींमध्येही मी ऱ्ह्यूमेटॉलॉजी डिपार्टमेंट सुरू केले.

• आर्थरायटिस काय आहे?

डॉ. श्रीकांत वाघ : हा जोडांमध्ये वेदना होणारा आजार आहे. देशातील १४ टक्के लोकसंख्या या आजाराने ग्रस्त आहे. यामध्ये मानदुखी, पाठदुखी सर्व गोष्टी येतात. आर्थरायटिस पेशंट्समध्ये महिलांची संख्या जास्त आहे. ४०-४५ च्या वयानंतर त्यांच्यामध्ये एस्ट्रोजन हार्मोन्सची कमतरता निर्माण झाल्याने सांधेदुखीची समस्या निर्माण होते. सांधेदुखीला सामान्य भाषेत संधीवात किंवा गठियावात म्हटले जाते. ऑर्थोपेडिक सर्जरीमध्ये त्याचा केवळ एक छोटासा चॅप्टर शिकविला जातो. खरेतर, त्याचे कमीत कमी १०० प्रकार असतात आणि ते प्रामुख्याने दोन भागांत विभागले जाते. पहिले, सांध्यामध्ये फक्त वेदना होणे म्हणजेच नॉन-इंफ्लेमेंटरी (सूज न येता फक्त वेदना) आर्थरायटिस आणि इंफ्लेमेंटरी म्हणजेच सांध्यामध्ये सूज निर्माण होणे, सांध्याची हालचाल न होणे, घर्षणानंतर वेदना निर्माण होणे, सकाळी उठल्यानंतर सांधेदुखीचा त्रास होणे आदींचा समावेश आहे. विनासुजेचे आर्थरायट्स सर्वसामान्यपणे व्यायाम न करणे आणि ऑक्युपेशनल कारणांनी होते. म्हणजेच एकाच स्थितीत जास्त वेळ काम करणे, सिटिंग जॉब, वाकून काम करणे आदी. सूज असलेल्या आर्थरायटिसमध्ये सांध्याच्या ठिकाणच्या हाडांजवळ सॉफ्ट टिश्यू लेयरमध्ये फ्लूड बनते. त्यामुळे हालचाल करणे कठीण बनते. सांध्यामध्ये आतील लेयरमध्ये सूज येऊ शकते. ते लवकर डायग्नोस न केल्याने आतमध्ये कायमस्वरूपी डॅमेज होऊ शकते.

• ही ब्रँच ऑर्थोपेडिक सर्जरीपेक्षा किती वेगळी आहे?

डॉ. श्रीकांत वाघ : ज्याप्रमाणे कार्डियाक सर्जन आणि कार्डियोलॉजिस्ट म्हणजेच हार्ट सर्जन आणि हार्ट फिजिशियन वेगवेगळे असतात, त्याचप्रमाणे अंतर ऱ्ह्यूमेटॉलॉजिस्ट म्हणजेच फिजिशियन आणि ऑर्थोपेडिक सर्जनमध्ये असते. त्याला तुम्ही ऑर्थो फिजिशियन म्हणू शकतात. जे स्पेसिफिक सांधेदुखीवर ट्रीटमेंट करतात. त्यांचे काम त्यामुळे अधिक महत्त्वपूर्ण बनते. कारण ऑर्थरायटिसचे योग्य डायग्नोसिस होणे अधिक महत्त्वपूर्ण असते. सांध्यामध्ये वेदना आहेत किंवा सूज आहे, हे ऱ्ह्यूमेटॉलॉजिस्ट अधिक चांगल्याप्रकारे डायग्नोसिस करू शकतो. इतक्या वेगवेगळ्या प्रकारचे ऑर्थरायटिसचे जेव्हा अचूक डायग्नोसिस होईल, तरच योग्य उपचार करणे शक्य होईल.

• कोणत्या प्रकारचे ऑर्थरायटिस घातक असतात? सिव्हियर झाल्यानंतर त्याचे घातक परिणाम काय आहेत?

डॉ. श्रीकांत वाघ : सूज असलेला संधीवात अतिशय घातक असतो. त्याचे डायग्नोसिसमध्ये उशीर झाल्यास अनेकदा सांध्यामध्ये कायमस्वरूपी डॅमेज होते. अशा स्थितीत काही जॉइंट्स रिप्लेस केले जाऊ शकतात. उदा. खांदे, कोपर, गुडघे आदी. परंतु शरीरात एकूण २०० जॉइंट असतात. त्यामुळे सर्वच प्रकारचे जोड रिप्लेस करणे तर शक्य नाही. अशा स्थितीत त्यांचे लवकरात लवकर डायग्नोसिस करून योग्य ट्रीटमेंट सुरू करणे आवश्यक असते. हे ऑर्थरायटिस सीव्हियर झाल्यानंतर अनेक प्रकारचे आजार सोबत घेऊन येते. उदा. डोळ्यांना सूज, डोळे लाल होणे, फुप्फुस कोरडे पडणे, दृष्टी कमी होणे, त्वचेला जखमा होणे, रक्तवाहिन्यांना सूज येणे आणि त्यामध्ये ब्लॉकेज येणे. त्यामुळे हार्टॲटॅक येण्याचीही शक्यताही निर्माण होते. अशी स्थिती पेशंटचे आयुष्य कमीत कमी ७ वर्षांनी कमी करू शकते. लोकांमध्ये अवेयरनेस असायला पाहिजे की, ज्याप्रमाणे छातीत दुखायला लागल्यानंतर ते कार्डियोलॉजिस्टकडे जातात आणि सर्जरीची आवश्यकता असल्यास कार्डियॅक सर्जनकडे जातात. त्याचप्रमाणे सांधेदुखीच्या स्थितीत त्यांनी सुरुवातीला ऱ्ह्यूमेटॉलॉजिस्टकडे जायला पाहिजे. त्यामुळे त्यांना विनासर्जरी उपचार मिळू शकतील.

• आर्थरायटिसची ट्रीटमेंट काय आहे? ती क्युअर केली जाऊ शकते का?

डॉ. श्रीकांत वाघ : सामान्य सांधेदुखीवर व्यायाम, पेनकिलरद्वारे उपचार केले जाऊ शकतात. परंतु समस्या कशाप्रकारची आहे, ते डायग्नोस करणे अत्यावश्यक असते. तरच योग्य उपचार दिले जाऊ शकतात. जर स्थिती गंभीर असेल, तर जॉइंट रिप्लेसमेंट किंवा सर्जरी हा पर्याय असतो. तसेच सूज असलेल्या आर्थरायटिसमध्ये कॉम्प्लिमेंटरी मेडिसीन म्हणजेच होमियोपॅथी, आयुर्वेद, एक्युप्रेशर आदींचा जराही उपयोग होत नाही. ही बाब सर्वसामान्यांनी समजून घेणे गरजेचे आहे. योग्य मार्गदर्शन न मिळाल्याने पेशंट भटकत राहतात आणि अशा स्थितीत चुकीचे उपचार आणि उपचारास उशीर होण्यामुळे समस्या अधिक वाढते. लोकांमध्ये गैरसमज आहे की, दीर्घकाळ ॲलोपॅथी ट्रीटमेंट घेतल्याने साइड इफेक्ट होतात. खरेतर ते आर्थरायटिसच्या बाबतीत हे एकदम चुकीचे आहे. योग्य ट्रीटमेंट मिळाल्यास ते ३ ते ६ महिन्यांत नियंत्रित केले जाऊ शकते. त्यानंतर पेशंटला जीवनभर कुठलीही औषधे घेण्याची आवश्यकता पडणार नाही. एरोबिक्स उदा. सायकलिंग, स्वीमिंग, वॉकिंग आदी नियमितपणे करावे लागते. त्यामुळे भविष्यात ही समस्या परत होणार नाही. खरेतर, कधीही सांधेदुखीचा त्रास सुरू झाल्यास ऱ्ह्यूमेटॉलॉजिस्टला ते अवश्य दाखवावे.

• आयुर्वेद आणि होमियोपॅथी डॉक्टर्सच्या मते, या पद्धतींमध्ये आर्थरायटिसची खूप चांगल्या प्रकारची ट्रीटमेंट आहे? याविषयी तुम्ही काय सांगाल?

डॉ. श्रीकांत वाघ : चरक संहितेमध्ये आर्थरायटिसविषयी केवळ २ लाइन दिल्या आहेत आणि माधवनिदानमध्ये सांधेवातावर २६ लाइन दिल्या आहेत. म्हणजेच आर्थरायटिसविषयी खूपच कमी देण्यात आले आहे. हे खरे आहे की, आयुर्वेदाची पायाभूत तत्त्वे चांगली आहेत. परंतु आयुर्वेद आणि होमियोपॅथीमध्ये आर्थरायटिसचे डायग्नोसिस करणे आणि त्यावरील औषधांमुळे किती फायदा झाला, याचे मोजमाप करण्याची सुविधा नाही. कुठलीही मेजरमेंट न करता तुम्ही कसे ठरवू शकता, की हा आजार बरा होत आहे किंवा नाही? औषधे काम करत आहेत किंवा नाही? त्याचा सायंटिफिक पुरावा असणे अत्यावश्यक असते. येथे ऱ्ह्यूमेटोलॉजीमध्ये ऑर्थरायटिस मेजरमेंटचे विशेष सॉफ्टवेअर असते. त्यामुळे पेशंटच्या समस्येची सातत्याने मेजरमेंट होत असते. या औषधांचे कोणतेच सर्टिफिकेशन नसते. त्यामुळे परदेशात डायट सप्लिमेंटच्या नावाने त्यांची विक्री होते. जर औषधे खरेच इतकी चांगली आणि सर्टिफाइड असती, तर आतापर्यंत एखाद्या इंटरनॅशनल कंपनीने ती घेतली असती आणि मोठ्या प्रमाणावर त्याचे मॅन्युफॅक्चरिंग करणेदेखील सुरू झाले असते. खरे तर, ही बाब केवळ उपचार पद्धतीची नाही तर डॉक्टरांच्या ट्रीटमेंटविषयीही आहे. पेशंटला स्वतःला समजायला हवे, की जर त्याला २-३ महिन्यांत काहीच फायदा होत नसेल, तर त्याने डॉक्टर बदलविणे गरजेचे आहे. जर दुसऱ्या पद्धतीचे डॉक्टर ऑर्थरायटिसची ट्रीटमेंट करत असतील, तर त्यांना ऑर्थरायटिसचे योग्य डायग्नोसिस करणे आणि मेडिसीनचा परिणाम मेजरमेंट करण्याचे प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. आयुर्वेद एक लाइफ स्टाइल आहे. केवळ त्याची औषधे विकणे आणि पंचकर्म सेंटर सुरू करणे आयुर्वेद नाही आहे.

त्यावर ऑनलाइन क्वेरीजदेखील सॉल्व करतात. कोणतीही व्यक्ती वेबसाइटला भेट देऊन आम्हाला आर्थरायटिसबाबत आपल्या समस्या सांगू शकते.

• तुमचे एक फाउंडेशनही आहे, त्या माध्यमातून तुम्ही कोणकोणती कामे करता?

डॉ. श्रीकांत वाघ : ऑर्थरायटिसच्या बाबतीत जनजागृती करण्यासाठी आम्ही अनेक कामे करतो. त्यापैकी एक आहे आमचे KYA फाउंडेशन (Know Your Arthrities) त्याचा अर्थ आहे की, आपल्या आर्थरायटिसविषयी माहिती करवून घ्या किंवा समजून घ्या. त्या माध्यमातून आम्ही आर्थरायटिसविषयी लोकांमध्ये एज्युकेशन आणि अवेयरनेस आणण्याचा प्रयत्न करतो. त्यासाठी व्याख्याने आयोजित करतो. डॉक्टर्सना जागरूक करण्यासाठी कॉन्फरन्सेस करतो. आम्ही पुस्तके प्रकाशित करतो. आर्थरायटिसच्या पेशंटसाठी योग्य डाएट, एक्सरसाइज आणि ट्रीटमेंट काय असायला पाहिजे, यावर पुस्तके लिहिली आहेत. सोबतच डॉक्टर्सला आर्थरायटिसविषयी सविस्तर माहिती देण्यासाठीही पुस्तके लिहिली आहेत. त्यामुळे डॉक्टर्सना आर्थरायटिस ओळखता येईल आणि ते पेशंटना योग्य विशेषज्ञांकडे पाठवतील. आर्थरायटिसवर 'आर्थरायटिस इंडिया' नावाने देशातील पहिली वेबसाइट बनविली आहे. त्यावर गेल्या ५ वर्षांमध्ये अनेक देशांतील ४० हजार लोकांनी आपले व्ह्यू दिले आहेत आणि आम्ही ऑनलाइन त्यांच्या क्वेरीजदेखील सॉल्व करतो. कोणतीही व्यक्ती वेबसाइटवर जाऊन आम्हाला आर्थरायटिसविषयी विचारू शकते. त्याचे उत्तर ४८ तासांमध्ये मी स्वतः देतो. आर्थरायटिस मेजरमेंट करण्याचे सॉफ्टवेअरदेखील पुण्यात आम्ही पहिल्यांदा आणले आहे.

• यापुढे काय योजना आहे? तुमची हॉबी काय आहे?

डॉ. श्रीकांत वाघ : मी संस्कृतमधून बीए करत आहे. त्यानंतर आयुर्वेदमध्ये पीएचडी करण्याची योजना आहे. मला म्युझिकमध्ये खूप आवड आहे. मी डॉक्टरांचे देव भगवान धन्वंतरीची आरती लिहिली आहे. त्यासाठी मी स्वतः म्युझिक दिले आहे आणि गायलेदेखील मी स्वतःच आहे. मी दररोज दिवसाची सुरुवात संगीत आणि योगाची प्रॅक्टिस करून करतो.

• तुमच्या कुटुंबात कोण कोण आहेत?

डॉ. श्रीकांत वाघ : माझी पत्नी वीणा हुजूरपागा ज्युनियर कॉलेजमध्ये कॉमर्स टीचर आहे. मुलगा मिहिर आणि सून अक्षता दोघांनी यूएसमधून एमएस केले आहे आणि तिथे जॉबदेखील करत आहेत. मुलगी मुक्ताचे फार्मसीमध्ये ग्रॅज्युएशन झाले आहे आणि एमएस केल्यानंतर न्यूयॉर्कला जाणार आहे.

थोडक्यात महत्त्वाचे – देशात मोठ्या मुश्किलीने ५०० संधिवात विशेषज्ञ आहेत. त्यापैकी बहुतेक डॉक्टर्सनी ऱ्ह्यूमेटॉलॉजीचे प्रशिक्षण घेतले आहे. देशातील सर्व मेडिकल कॉलेजमध्ये एकूणच ऱ्ह्यूमेटॉलॉजीच्या १० जागा आहेत. पुण्यात ४०० पेक्षा अधिक ऑर्थोपेडिक सर्जन आहेत आणि त्यांच्यामागे केवळ ८ ऱ्ह्यूमेटॉलॉजिस्ट आहेत.

Popular among lacs of readers across Maharashtra
3 Daily Newspapers in 3 Languages
For last 44 years, Aaj Ka Anand group has been involved in giving quality reading material to the readers through its dailies... The thirst for knowledge, education and information of readers is identified by the group and the same is shared in the dailies... These are the dailies which have something to read for everyone in the family...
Newspapers filled with Education & Entertainment content